
# साथीदार

वार्षिक (२००३)



देणगी मूल्य : ५०/- रु. (स्थानिक) • ४ यु. एस. डॉलर्स (परदेशी)

साथीदार

अनुक्रमणिका


१. संपादकीय ... १
*बिंदुमाधव खिरे*

२. सिनेमा- गुलाबी आईना ... २
*मुलाखत*
*श्रीधर रंगायन,*
*सागर गुप्ता,*
*विवेक आनंद*

३. नाटक- एस ई एक्स शऽऽऽ ... ६
*मुलाखत*
*वैभव आबनावे,*
*धनेश जोशी,*
*ओंकार गोवर्धन*

४. लैंगिकता ... १०
*मुलाखत*
*डॉ. भूषण शुक्ल*

५. *ए. आर. टी. (ART)* ... १३
*मुलाखत*
*डॉ. आर. गंगाखेडकर*



- साथीदार (वार्षिक २००३)
- संपादक/प्रकाशक/मुद्रक : बिंदुमाधव खिरे
- मुद्रणस्थळ : पुणे, भारत
- पत्रव्यवहार : khirebindu@yahoo.com OR khirebindu@hotmail.com
- फक्त खाजगी वितरणासाठी


- © सर्व हक्क सुरक्षित
- लेख व मुलाखतींमधील मते व विचार हे वैयक्तिक असून संपादक त्याच्याशी सहमत असतीलच असे नाही.


- देणगी मूल्य : ५०/- रु. (स्थानिक)
- ४ यु. एस. डॉलर्स (परदेशी)


## संपादकीय

*दिनांक : २६, सप्टेंबर २००३ पुणे*

लेखक : बिंदुमाधव खिरे

# पहिल्या अंकाच्या निमित्ताने

या मासिकाबद्दल बरेच प्रश्न माझ्या मनात अनेक दिवस घोळत होते. या पहिल्या अंकाच्या निमित्ताने या माझ्याच प्रश्नांची मीच दिलेली उत्तरे....

### मराठी समलिंगी (गे) अंक का ?

माझ्या ट्रस्टच्या कामाच्या निमित्ताने अनेक समलिंगी मुले (गे) मला भेटायला येतात. बहुतेक मला काही या विषयातलं वाचायला आहे का विचारतात. त्यात "काही वाचायला आहे का?" या प्रश्नांमागे 'अश्लील' चित्रे बघायला (पोर्नोग्राफी) आहेत का ही भूमिका असते. पण इतर बरेच असे असतात की त्यांना या विषयावरची माहिती, विचार, अनुभव वाचायची इच्छा असते. मग मी त्यांना इंग्रजी कथा देतो. पण त्यांतल्या बऱ्याच मुलांना इंग्रजी फारसं येत नाही...आपलं जेमतेम...त्यांना इंग्रजी वाचायला वेळही लागतो आणि फारसं झेपतही नाही. दुसरी गोष्ट म्हणजे बहुतेक इंग्रजी पुस्तकं ही पाश्चात्त्य संस्कृतीवर आधारीत असल्यामुळे गे विषय असूनसुद्धा त्यांना त्या इंग्रजी कथा परक्या वाटतात. मला त्यांना, "मराठीत फारसं काही वाचायला नाही." हे सांगायला शरम वाटली आणि अजूनही वाटते... जी गोष्ट आपले लोक सहजासहजी बोलू शकत नाहीत त्यांनी, त्यांच्या समाजाबद्दल कुठून माहिती मिळवायची? त्यांचा आवाज कुठे आणि कसा उमटणार?

### ते दरमहा असले पाहिजे का वार्षिक असले पाहिजे?

हा प्रश्न मला किती वेळ आहे या उत्तरावर अवलंबून आहे... मला दर महिन्यांने हे काढणं शक्य नाही. 'इट्स आफ्टरऑल अ फुलटाईम जॉब.' त्यामुळे हा अंक वार्षिक स्वरूपात काढायचं असे ठरवलं. पहिल्यांदा हा अंक काढताना काय अनुभव येतो हेही महत्त्वाचं आहे.

**लेख गे विषयाशी निगडीत असले पाहिजेत का? का बरेच 'स्ट्रेट' लेख घालायचे आणि मध्ये एखादा गे लेख घुसडायचा?**

विचार केल्यावर ती कल्पना मला रुचली नाही... मराठीत गे समाजाचा हक्काचा एक (तरी) अंक असावा. असा माझा अट्टहास आहे... यावर मी तडजोड करू इच्छीत नाही... हळू हळू का होईना या पळवाटा आपण बंद करायला हव्यात.. मला माहीत आहे की ते एकदम मला किंवा इतरांना जमणार नाही... पण कुठून तरी सुरुवात करायला हवी...

**त्यात काय काय लेख असले पाहिजेत ?**

गे- लेख, गोष्टी, कविता, नाटक, मुलाखती, फोटोज ('नॉन-पोर्नोग्राफिक') चालतील... 'स्ट्रेट' (भिन्न-लिंगी) व्यक्तींनी लिहिलेल्या, मुलाखती दिलेल्या, कविता केलेल्या पण चालतील. अट एकच की हे सगळं गे विषयाशी निगडीत हवं. आत्ता तरी अश्लील वाङ्मय (पोर्नोग्राफिक मटेरीयल') छापायचं नाही. माझ्या 'पोर्नोग्राफीक मटेरीअल'ला अजिबात विरोध नाही. पण एका वेळी एक पाऊल.

**त्याची प्रसिद्धी आणि विक्री कशी काय करणार?**

आत्ता तरी गे ई-मेल लीस्ट, गे वेब साईट्स आणि 'वर्ड ऑफ माऊथ' नी प्रसिद्धी करायची असा विचार आहे. वर्तमानपत्रात जाहिरात देणं आर्थिकदृष्ट्या शक्य नाही. तशा जाहिराती दिल्यावर कदाचित काही कटकटीही निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही... सगळी धाडसं एकाच वेळी करायची हिम्मत माझ्यात नाही.

**कोण विकत घेणार?**

काही मित्रांना विचारल्यावर लक्षात आलं की बहुतेकजण हा अंक विकत (किंवा फुकट) घ्यायला तयार नाहीत... कारण हा अंक घरी घेऊन जाता येणार नाही... ते कदाचित एका अंकाचे पैसे देतील पण अंक घेणार नाहीत. त्यामुळे या वेळी फक्त पन्नास अंकच काढायचे ठरविले...

**पुढच्या वर्षी काय?**

या वर्षीचा अनुभव काय येतो हे महत्त्वाचे...मी जो पैसा हा अंक काढण्यात ओततो आहे तो परत मिळणार का (ना नफा ना तोटा या तत्त्वावर)? नाही मिळाला तर पुढच्या वर्षी परत अजून या अंकासाठी पैसा खर्च करायला मी तयार आहे का? माझ्याकडे आत्ता तरी याचं उत्तर नाही. दुसरी गोष्ट या अंकाला प्रतिसाद किती आणि काय मिळतो? वाचकांची पत्रे काय सांगतात, यावरही हा निर्णय अवलंबून आहे. म्हणून या वेळी तरी फक्त एक वर्ष अंक काढून बघू... पुढच्या वर्षीची चिंता आत्ता नको. असा विचार केला.

**आभार**

मला बऱ्याच लोकांनी या अंकासाठी मदत केली. त्या सगळ्यांचा मी मनापासून आभारी आहे. डॉ. गंगाखेडकर आणि डॉ. भूषण शुक्ल यांचा मी विशेष ऋणी आहे.

---

# चित्रपट गुलाबी आईना

## मुलाखत

*दिनांक :*
*२९, ऑगस्ट २००३*
*जोगेश्वरी, मुंबई*

**परिचय**

पुण्यात सप्टेंबर मध्ये 'गुलाबी आईना' हा चित्रपट दाखवण्यात आला. गुलाबी आईना ही ४० मिनिटांची फिल्म. विषय दोन कोथ्यांचं ('ड्रॅग क्वीन्स') नातं. बिब्बो आणि शब्बोचं. हा गुलाबी आरसा साक्षीदार आहे त्यांच्यातील प्रेमाचा, जिव्हाळ्याचा, खोचकपणाचा, बेडरपणाचा. माझ्या अंदाजाने ही पहिलीच वेळ आहे की या फिल्ममध्ये कोथी यातली हिरो (खरं तर हिरोईन्स) आहेत. या फिल्मला बऱ्याच नामवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांत आमंत्रित केलं गेलं (वर्ल्ड प्रिमियर- टुरीन

आय.जी. एस.एफ.एस. सॅन फ्रान्सिस्को गे फिल्म फेस्टीव्हल, व्हॅन्कुव्हर फिल्म फेस्टीव्हल, कॅनडा आणि फेस्टीव्हल्स इन स्वित्झर्लंड, बुसान, जर्मनी, फिलीपीन्स, आयरलँड रिपब्लिक). या सिनेमाच्या निमित्ताने या सिनेमाचे दिग्दर्शक श्रीधर रंगायन, निर्माता आणि कला-दिग्दर्शक सागर गुप्ता आणि एक्झिक्युटिव्ह प्रोड्यूसर विवेक आनंदशी गप्पा-गोष्टी झाल्या.

**संकल्पना**

विवेक : अनेक वर्षं मी, श्रीधर, सागर बरोबर काम करत आलो आहोत. आत्तापर्यंत झालेल्या आमच्या प्रोजेक्टमध्ये आम्ही सगळे पहिल्यापासूनच सहभागी आहोत. श्रीधरच्या मनात दोन-एक वर्षं ही कल्पना घोळत होती आणि या ही प्रोजेक्टमध्ये मी आलो. ही माझी पहिलीच ड्रॅग क्वीन्स/गे फिल्म आहे आणि ग्रुपसाठीसुद्धा ही पहिलीच वेळ आहे.

श्रीधर : मी पहिल्यांदा विचार केला एक गे (समलैंगिक) फिल्मचा तो १९९४ मध्ये 'वेटींग फॉर मि. राईट.' ती एक 'फुल लेन्थ फीचर' म्हणून विचारात होती. एका मुलाची 'कमिंग आऊट स्टोरी' होती; तो त्याच्या शेजाऱ्याच्या प्रेमात पडतो. एक दहा पानी आराखडा तयार होता, जो वेगवेगळ्या लोकांना वाचून दाखवण्यात आला होता. एका 'इटालियन प्रोड्यूसर' कडे आम्ही गेलो होतो. त्याला कथा इन्ट्रेस्टिंग वाटली पण त्या विषयात नावीन्य नाही वाटले. चित्रपटासाठी भारतात हा विषय नवीन असला तरी त्याच्यासाठी तो फार जुना होता.

विवेक : 'कमिंग आऊट' (आपण गे आहोत हे अभिमानाने स्वीकारणं आणि घरच्यांना, मित्रांना, इतरांना सांगणं) हा इथे अजूनही मोठा प्रश्न आहे. मला आठवतंय की अशोक (राव कवि) नी एका मासिकात १९८४ मध्ये एक मुलाखत दिली होती आणि त्यात त्यांनी जे प्रश्न मांडले होते ते सगळेच्या सगळे अजूनसुद्धा आहेत.... मग मला प्रश्न पडतो की (इतक्या वर्षांनी सुद्धा) खरंच काही बदल झाला आहे का?

(बिंदू : आणि दहा वर्षांनंतरसुद्धा हेच प्रश्न असणार आहेत....)

विवेक : हो ना.. आज-काल गे असणं ही एक जीवनपद्धती ('लाईफ स्टाईल') मानली जाते. मी उद्या एका स्ट्रेट (भिन्नलिंगी) मित्राला जर सांगितलं की मी 'गे' आहे तर तो म्हणेल की चुत्या, तू ती निवडलेली आहेस... ही मेट्रोसेक्शुअल कॉन्सेप्ट. त्याला जर ती एक फक्त 'मेट्रोसेक्शुअल' जीवनपद्धती वाटते तर त्याला गे असणं म्हणजे काय हे कसं कळणार? तो कसा काय समजून घेण्याचा प्रयत्न करणार?

श्रीधर : या मेट्रोसेक्सुॲलिटीचा आपल्या कार्याला काही उपयोग नाही..

विवेक : शेवटी आपल्याला काय पाहिजे? की आपल्याला इतर समाजाबरोबर मानाने जगायचंय. पण ते होतंय का? सध्या हे (गे असणं) एक फॅड मानलं जातं.

(बिंदू : आज-कल बहुत सुननेको मिलता है...)

विवेक : हो... मला जर एखादी गे फिल्म करता आली तर मी पहिल्यांदा गे या शब्दाच्या छत्रछायेत कोण कोण बसतात ('डायास्पोरा ऑफ गे कल्चर') हे दाखवीन. माझ्या डोक्यात एक स्क्रीप्ट होती की जिथे सुरुवातीच्या सीनमध्ये एक गे मुलगा (जो आऊट नाहीये) एका गे पार्टीत जातो आणि तिथे तो सगळ्या तऱ्हेच्या गे लोकांना भेटतो... जिथे दाखवता येईल की हे सगळे आम्ही आहोत.. पुरुषी, बायकी, राजे, राण्या, शर्ट-पॅन्ट घालणारे, साड्या नेसणारे, म्हातारी माणसं आवडणारे तरुण, तरुण पोरं आवडणारे म्हातारे, सगळं सगळं काही.. 'वी आर ऑल होमोसेक्सुअल मेन अंडर वन अंब्रेला ॲन्ड नो ॲपोलॉजिज् अबाऊट एनिथिंग.'

श्रीधर : चाळीस मिनिटांत काय काय दाखवणार.. म्हणून ठरवायला लागलं की किती सांगायचं...

विवेक : एका फुल लेन्थ फिल्ममध्ये बरंच काही सांगता येतं... पण चाळीस मिनिटांत काय काय सांगणार...

श्रीधर : हो म्हणूनच मी अनेक गोष्टी सांगायचा अट्टहास न धरता... एकच गोष्ट चांगली सांगायचा प्रयत्न केला...

विवेक : एक जाणीवपूर्वक प्रयत्न केला गेला की

एक रोमॅन्टिक जोडी दाखवायची. स्ट्रेट ऑडीयन्सला या नात्याची सेक्स पासून सुरुवात दाखवायची नव्हती. एक तर त्यांना जड गेलं असतं आणि दुसरं त्यांना अपेक्षित असलेलं 'स्टीरीओटाईप'च मिळालं असतं.

श्रीधर : आपल्या समाजात खूप वेळा सेक्स पासूनच नात्याला ('रिलेशनशिप') सुरुवात होते.

विवेक : हो पण नेहमी नाही.. मी स्वत: रोमॅन्स पाहिले आहेत, ज्याची सुरुवात सेक्सपासून झालेली नाही... आणि असेसुद्धा की जे रोमॅन्स म्हणून सुरू झाले पण ज्याचं नात्यात रूपांतर नाही झालं.

(बिंदू : मला पुण्यातले सुद्धा लोक माहीत आहेत की ज्यांची सेक्सने सुरुवात नव्हती... 'इट्‌स नॉट ऑल्वेज लूज अॅन्ड क्रुझिंग.')

विवेक : मुताऱ्यांमध्ये सेक्स चालतो ही वस्तुस्थिती आहे पण ते एकच सत्य नाही आहे..

............

श्रीधर : आम्ही दोन मुलांची एक प्रेमकहाणी करायचं ठरवलं होतं. त्याचं नाव होतं 'निले पिले परदे.' टिपीकल लव्ह स्टोरी होती, पण मुलीच्या ऐवजी तिथे मुलगा होता.

विवेक : मी ही कल्पना घेऊन 'झी टीव्ही' कडे गेलो होतो आणि त्यांना ती आवडली पण होती.. तिथल्या एका एक्झिक्युटीव्हनी खूप उत्तेजन दिलं. आम्हाला खूप आनंद झाला होता पण दोन दिवसांनी त्यांनी कळवलं की, 'अभी नहीं।' 'धिस इज नॉट द राईट टाईम.'

श्रीधर : मला वाटतं 'गुलाबी आईना' ची कल्पना 'दरमियाँ' पासून आली. मी त्या सिनेमात असिस्टंट डायरेक्टर होतो. सुरुवातीची 'दरमियाँ'ची जी पटकथा होती ती खूप हिजड्यांविरोधी होती, समलैंगिक द्वेष्टी होती. मी त्यातला बराच भाग परत लिहिला. रमेश आणि एडविननी मला हिजड्यांच्या भाषेबद्दल माहिती दिली. ते मला बांद्रा आणि इतर ठिकाणी घेऊन गेले, हिजड्यांशी बोलण्यासाठी. सागरनी संवाद लिहिले. ते मिश्रण होतं उर्दू (लखनवी) आणि हिंदी (बंबईय्या). नंतर मी 'दरमियाँ'च्या प्रकल्पातून बाहेर पडलो.. काही मतभेदांमुळे. अजूनही या सिनेमात खूप 'होमोफोबिया' आहे. बिब्बो आणि शब्बो ही पात्रं याच सिनेमामधल्या पात्रांवरून सुचली... आम्हाला माहीत होतं की आम्हाला या फिल्मसाठी पैसे कुठूनही मिळणार नाहीत. जर फिल्म करायची असेल तर स्वबळावरच केली पाहिजे.... अणि आत्ताच केली पाहिजे... तरच आपल्या हातून होईल.

**संवेदनशीलता (सेन्सीटाईझेशन)**

सागर : हा चित्रपट करणं ही खूप मोठी जबाबदारी होती... जैसे मैं पुणे के टाईम पे (पुण्यात स्क्रिनींग झाल्यानंतर) मै बता रहा था... मला काळजी होती की फिल्म 'क्रू' मध्ये जे अशिक्षित लोक होते (लाईटमन, स्पॉट बॉईज) त्यांची प्रतिक्रिया काय असेल? आम्ही आमचा नेहमीचा प्रॉडक्शन मॅनेजर न घेता दुसरं कोणीतरी घेऊ असासुद्धा विचार केला कारण आम्हाला शंका होती की त्याला या प्रोजेक्टमध्ये भाग घ्यायला आवडेल की नाही.. मग आम्ही त्याच्याशी बोललो आणि सांगितलं की आम्ही अशा तऱ्हेची फिल्म करत आहोत. चांगली गोष्ट म्हणजे तो म्हणाला की विषय चांगला आहे आणि त्यांनी असे लोक पाहिलेले आहेत... चित्रपट सृष्टीत आणि इतरत्रसुद्धा... काळजी लाईटमन, स्पॉट बॉईजना काय वाटेल? सेटवर खोल्यांत काही चित्रं लावली होती. पहिल्या दिवशी कोणी काही प्रश्न विचारला नाही. दुसऱ्या दिवशी एक सीन बेडरूममध्ये होता. बेडरूममध्ये जी चित्रं होती त्यांत दोन नग्न पुरुष होते... मी सांगितलं की ही चित्रं दारावर लावा... मग एकाने विचारलं, "दादा ये ऐसा क्या... ये पेंटीग्ज ऐसे क्यों हैं?" मी म्हणालो, "कहानी मे जैसे कॅरेक्टर्स हैं वैसे उनका घर सजाना है... ये दोनों आदमी होके आदमीयोंसे प्यार करते हैं... इसलिये ऐसे 'पेंटींग्ज.." या वेळी मला आवर्जून सांगावंसं वाटतं की ही गे फिल्म नसून 'ड्रॅग क्वीन्स' वर फिल्म आहे.. मैने उनके (युनिट मेम्बर्स) सवाल के जवाब देने की कोशिश की... टाल देने की कोशिश नहीं की... कि बाद में बतायेंगे...

...चित्रीकरणाचा शेवटचा दिवस. एक मावशी होत्या. सगळीकडे बारीक लक्ष ठेवत होत्या... (की कोई कुछ तोड/फोड ना दे. घर का सामान उठा ना ले जाये... फिल्म युनिट्स इसके लिये बहुत बदनाम है). शेवटचा सीन होता. 'उमराव जान' मधलं गाणं... तो शॉट घेतांना त्या इतक्या दंग होऊन गेल्या होत्या की नंतर त्या रमेश

आणि एडविनला म्हणाल्या, "खुदा तुम दोनों की जोडी सलामत रखे... बहोत अच्छी जोडी है"... दॅट वॉज अ ग्रेट कॉम्प्लिमेंट'...

### श्रीगणेशा

श्रीधर : नारळ फोडण्यासाठी अशोक (राव कवि) ना निमंत्रित करण्यात आलं. अशोकनी सुरुवात करून देणं ही आमच्यासाठी खूप अभिमानाची गोष्ट होती. आणि अशोक तो नारळ फोडणार म्हटल्यावर जे व्हायचे तेच झालं... अशोक नारळ आपटतोय... नारळ फुटायला तयार नव्हता.. एकदा झालं... दोनदा झालं... अशोक ओरडतोय 'कम ऑन ब्रेक ब्रेक' शेवटी एकदाचा तो फुटला... 'अ व्हेरी कॅम्प बिगिनींग'...

### द्वंद्व

श्रीधर : माझी सुरुवात एक कलाकार म्हणून झाली, मग मी गे ॲक्टिव्हीस्ट बनलो आणि आता मला वाटतं की मी दोन्ही एकाच वेळी आहे. मला हा संघर्ष 'दरमियाँ' मध्ये फार जाणवला (आर्टिस्ट आणि ॲक्टीव्हिस्ट मधला) किती सांगायचं? किती पटेल? या फिल्ममध्ये तो संघर्ष नव्हता.. कुठलाही विरोधाभास नव्हता... कुठलीही वेष्टनं नव्हती... आपल्याला पाहिजे ते करण्यास पूर्णपणे स्वातंत्र्य होतं...

विवेक : ॲक्टीव्हिस्ट आणि फिल्ममेकर. दोन मुद्दे आहेत. एक असा की एच.आय.व्ही./एड्स चा अँगल काय असावा? तो नाट्यासाठी वापरावा का? दिग्दर्शकाला तो विषय नाट्यासाठी वापरण्याचा अधिकार आहे... पण मग तो नुसताच घुसडायला नको.. त्याची हाताळणी नाजूकपणे केली पाहिजे... मग मध्ये मध्ये फिल्म मध्ये हिंट्स दिले पाहिजेत... आणि मग शेवटी तो ड्रॅमॅटीक इम्पॅक्ट येईल..

...दुसरं असं की अशी फिल्म पहिली गे फिल्म असावी का? गे लोक अशाच तऱ्हेची असतात असा त्याचा अर्थ होईल का? याचं मी अजून स्वत:ला उत्तर देऊ शकलो नाही. माझ्या वडिलांनी ही फिल्म पाहिली तर? ते काय म्हणतील... 'तू हे करतोस का? तू ही शब्बो आहेस का?' असं मनाला वाटतं. बरं मी असं म्हणू शकत नाही की ही माझी फिल्म नाही आहे. मी त्यातला एक भाग आहे. मग मी कसं काय त्यांना समजावणार? ही जर पहिली फिल्म नसती, तिसरी चवथी फिल्म असती तर ठीक होतं...

पण मग असा विचार आला की कोथ्या या आपल्या समाजाचा (गे) एक भाग आहेत... मला जे वाटतं की लोकांनी फक्त 'पॉलिटिकली करेक्ट' आहे तेच बघावं हे कितपत बरोबर आहे? मी स्वत:चा अॅजेंडा तर लादत नाही आहे ना? सगळे इश्यू हे फक्त स्ट्रेट ॲक्टींग गेज् शीच का निगडीत पाहिजेत? सगळे जण त्याच (गे) छत्रछायेत आहेत. मी स्ट्रेट ॲक्टींग आहे म्हणून माझे प्रश्न जास्त महत्त्वाचे आहेत हे दिग्दर्शकावर लादणं हा त्याच्यावर अन्याय आहे.

### सेन्सॉर

श्रीधर : एक सेन्सॉर बोर्डाचे अधिकारी म्हणाले की 'आप ऐसा क्यों करते हैं'? तुम्ही न बोलता बोलत का नाही आणि न दाखवता दाखवत का नाही? (व्हाय कान्ट यु से विदाऊट सेईंग इट ॲन्ड शो विदाऊट शोईंग इट?)... मग मी म्हणालो, 'मग काय उरतं?' हे किती दुटप्पी धोरण आहे. मी त्यांना म्हणालो की मी 'सई परांजपे स्कूल ऑफ फिल्म मेकींग' चा आहे. कुणाला उत्तेजित करण्यासाठी मी काही करणार नाही... जे काही दाखवलं आहे ते आवश्यक आहे... अधिकारी म्हणाले, "उद्या रेप दाखवला तर तुम्ही पुरा अंदर डालके दिखायेंगे क्या?" मी म्हणालो, की हे तुम्ही फार टोकाचं उदाहरण घेत आहात... हे असलं काहीच दाखवलेलं नाही...अधिकारी म्हणाला, "थोडा रीवाईज करो ना."

(बिंदू : थोडा 'ॲडजस्ट' कहां और कैसे करो?)

श्रीधर : एक्झॅक्टली... तो म्हणाला, "कोई भी सबजेक्ट पर बना सकते हैं... लेकिन रीवाईजिंग कमिटीको ऐसा नहीं लगना चाहिये की ये उनके खिलाफ है". विषयच मुळात त्यांच्यासाठी कटकटीचा आहे. एक दोन लाईनी किंवा शब्दांचा प्रश्न नाही आहे. सगळा चित्रपट त्यांच्यासाठी तापदायक आहे... म्हणून त्यांनी सेन्सॉर सर्टिफिकेट नाकारलं. कुठेही असं म्हटलं नाही की तो 'समलैंगिक' विषयामुळे नाकारला आहे. नापास करण्याचं कारण दाखवलंय की तो अश्लील आणि बीभत्स आहे... 'नाऊ इट्स मायर्ड इन रेड टेप'.....

**बाळंतपणानंतर**

सागर : आम्हाला वाटलं चित्रपट करून झाला म्हणजे आपलं काम संपलं... पण आता लक्षात येतंय की ही फिल्म वेगवेगळ्या महोत्सवांना पाठवणं, त्याचं को-ऑर्डिनेशन करणं हे चित्रपट काढण्यापेक्षा मोठं काम आहे... आणि ते सुद्धा एकही पैसा मोबदला म्हणून येत नसताना.... 'डिजीटल टॉकीज' शी संपर्क साधल्यावर 'एल.जी.बी.टी.' फिल्म्स्चं एक नवीनच विश्व आमच्या समोर उभं राहिलं.... आता आमचं मार्केटिंग एक नुसतंच काम न राहता आम्ही पूर्णपणे त्यांनी झपाटून गेलो आहोत की जास्तीत जास्त चित्रपट महोत्सवांत आपला चित्रपट दाखवला जावा... आणि जिथे शक्य आहे तिथे एन्ट्री फी माफ करून घ्यायची... कारण २०-३० डॉलर एन्ट्री फी म्हटली तरी ती आम्हाला परवडत नाही... ओह! श्रीधर म्हणाला की नाही हे मला माहीत नाही पण आज आमच्यासाठी एक फार महत्त्वाचा दिवस आहे... सॅन फ्रान्सिस्को ला क्वियर फिल्मस्तान साऊथ एशियन चित्रपट महोत्सवात 'त्रिकोण' तर्फे 'गुलाबी आईना' ओपनिंग फिल्म म्हणून दाखविली जाणार आहे...

...........

श्रीधर : टी व्ही सध्या फक्त मास ऑडीयन्स, महिलाप्रधान फेज मध्ये आहे... कोणीही काही वेगळं देण्याचा प्रयत्न करत नाही... गे इश्यू तर बाजूलाच.. डिस्कव्हरी सारखे चॅनेल्स् आहेत का? चॅनेल्स्चं सोडून द्या, वेगळ्या (स्पेशलाईज्ड) प्रोग्रॅम्स्साठी स्लॉट्स तरी आहेत का? डॉक्युमेन्ट्रीज कुठे आहेत? सगळे चॅनेल्स् तेच तेच करतात... एकमेकांची कॉपी करतात. पण एकही जण नवीन किंवा वेगळं करण्याचा/दाखवण्याचा प्रयत्न करत नाही.... दूरदर्शन थोडे वेगळे प्रोग्रॅम दाखवतं पण ही फिल्म ते कधीच घेणार नाहीत.

**आपलं अपत्य**

श्रीधर : 'रीयाध वाडिया' मला म्हणाला की तुला ही फिल्म आता आयुष्यभर सांभाळावी लागणार आहे. तू म्हणू शकत नाहीस की माझं काम संपलं. अनेक वर्षांनंतरसुद्धा कोणी तरी तुला त्याची एक टेप नक्कीच मागेल... तुझं 'गुलाबी आईना'शी लग्न लागलं आहे.

सागर : मै ऐसा सोचता हूँ... अपनी बेटी है... गोरी हो या काली हो। हमें इसे पालना पोसना है.... आगेवाली औलाद बेशक इससे भी गोरी हो लेकिन, ये अपनी पहली औलाद है...।

श्रीधर : आम्ही अशा सात चित्रपटांचा संच बनवणार आहोत (४० मिनिटांची एक फिल्म). या फिल्म्स गे जोडपी, बायसेक्शुअल, बायकांशी लग्न झालेले गे पुरुष, हिजडे... असे विषय असतील... आमची पुढच्या फिल्मची स्क्रीप्ट तयार आहे... पैशांची वाट बघत आहोत... आपल्या गे समाजाने पैसे उभे करण्यासाठी जरूर पुढाकार घ्यावा.

---

## मुलाखत

*दिनांक :*
*१०, ऑक्टोबर २००३*
*पुणे*

## नाटक
## एस ई एक्स शऽऽऽ

**परिचय**

पुण्याच्या कॉलेजमधल्या मुलांनी 'एस ई एक्स श्ऽऽऽ' हे नाटक बसवलं. त्याला उत्कृष्ट प्रायोगिक नाटक - सत्यदेव दुबे पुरस्कार (थिएटर ॲकॅडमी कॉम्पिटीशन २००२) मिळाला. या नाटकाचा केंद्रबिंदू लैंगिक विषयाबद्दल असणारी भीती आहे. यात एक गे (समलैंगिक) पात्र आहे. या नाटकाच्या निमित्ताने लेखक (वैभव आबनावे), दिग्दर्शक (धनेश जोशी) आणि गे पात्राचं काम करणाऱ्या (ओंकार गोवर्धन) यांच्याशी केलेली चर्चा.

**नाटकाविषयी**

राहुल, केतन, अश्विनी १७-१८ वर्षांची मुलं, एका संध्याकाळी केतनच्या 'सेपरेट' आणि मुख्य घरापासून 'डिटॅच्ड' खोलीमध्ये जमले असताना 'कॉम्प्युटर'वर

कुठल्याशा इंग्रजी फिल्मच्या जागी 'ब्लू फिल्म' सुरू होते. अश्विनी निघून जाते. का? नंतर राहुलही निघून जातो.... का तिथेच थांबतो? दुसऱ्या संध्याकाळी कोणी काळा चष्मा लावलेला मागावर असल्या कारणाने अश्विनी आणि राहुल त्याच खोलीमध्ये येतात. पण तिघंही गप्प. काय बोलणार? पण 'बोलल्या शिवाय एकमेकांमधली 'स्पेस' कशी भरून निघणार?.... 'रिलेशन्स' म्हणजे बोलून 'स्पेस' कमी करणं हे सत्य जाणवल्यामुळं त्यांच्या लहानपणात घडलेल्या, आजवर उच्चारही न केलेल्या गोष्टी पृष्ठभागावर येऊ लागतात.

**संकल्पना**

वैभव : एखादं नाटक बऱ्याच गोष्टींपासून सुरू झालं असं सांगता येईल, पण ही प्रक्रिया बऱ्याच वर्षांपासून 'सबकॉन्शसली' सुरू झाली असावी, 'एक्सपिरियन्सेस', इतरजण भेटलेले, की जे त्या वयामध्ये जसं वागले त्याचा अर्थ कळण्याजोगा नव्हता. घरच्यांशी न बोलणं हा अलिखित नियमच होता.... (सेक्स सिक्रीटस) आपल्यालाच फक्त माहीत आहे बाकी कोणालाच माहीत नाही म्हटल्यावर ते एक आपलं 'सिक्रीट' असतं आणि 'बर्डन' असतं... दडपण असतं आणि त्यातली भीती असते...

माझ्या मित्राची एक खोली होती की ज्याचा 'एनट्रन्स डिचॅच्ड' होता.... त्या खोलीचा मुख्य घराशी काहीच संबंध नाही... घर म्हणजे आई-बाबा, त्यांनी सांगितलं तसंच वागलं पाहिजे, घर म्हणजे एक 'कम्युनिकेशन गॅप'हेच 'मेटॅफर' माझ्या डोक्यात बसलं. ही खोली माझ्या मनात राहिली होती. एक जागा जिथे त्या मुलाला 'आऊटलेट' मिळू शकेल अशी ही जागा...

राडा सुरू होतो या सगळ्याला 'फॉर्म' किंवा 'स्ट्रक्चर' द्यायची पाळी येते तेव्हा. मी सुरुवातीला दोघांचं नाटक लिहिलं होतं (एक मुलगा आणि एक मुलगी). हे दोघं एकांतात काय करतील. ते एक 'व्हलगर' स्वरूपाचं नाटक होतं. त्यात आता काय काय दाखवता येईल... आता टाकतोच बॉम्ब अशा विचारांनी लिहिलेलं नाटक होतं. धनेश आणि सुब्रतला वाचून दाखवलं. दोन पात्रं इथं जन्मली... तिसरा मित्र कुठुन आला हे मलाही कळलं नाही. त्या सगळ्या पात्रांना एक पास्ट देण्यात आला आणि अशी वेगवेगळी वेष्टनं त्या 'कम्युनिकेशन गॅप'च्या कोअरवर लादत गेली. तो मनुष्य मात्र 'जेन्युइनली' आला... माझी जी भीती होती, माझ्या मनामध्ये ज्या काही नैतिकतेच्या कल्पना होत्या त्या मला 'अलाऊ' करू देईनात. या सगळ्या गोष्टी आहेत त्या सगळ्या 'लिबरली ॲक्सेप्ट' करायला. ही जी भीती होती तिने एक मूर्त स्वरूप घेतलं या पात्रामधनं... दीड एक वर्षांचा हा कालावधी होता आणि मग मी एक ब्रिटिश कौन्सिलच्या वर्कशॉप मध्ये हे नाटक पूर्ण केलं.

धनेश : तीन वर्षांपूर्वी सुब्रत आणि वैभवचा हा विषय होता की मी माझ्या आई-वडिलांचा सेक्स पाहिला तर मी कसा 'रियॅक्ट' होईन म्हणजे अगदी 'सबजेक्टिव्हली'. वैभवनी त्यावर एक ड्राफ्ट लिहिला होता आणि मी वाचला होता. मध्यंतरी त्यानं 'काळा हंस' नाटक लिहिलं. ते आम्ही बसवलं आणि हा विषय तोपर्यंत अगदी 'वॉशआऊटच' झाला होता. पण पुन्हा यानं हा ड्राफ्ट लिहायला घेतला. मग त्यावरून खूप चर्चा झाली... ती खोली कशी असेल, तिथले दिवे गेले तर काय होईल.... मला तो एक 'पर्सनल चॅलेंज' म्हणून वाटला... माझं या विषयातलं ज्ञान खूप कमी आहे... थोडं फार मित्रमंडळी आणि एच. आय. व्ही. / एड्स च एक शिबिर एवढ्या आधारावर हे नाटक मी कसं करू शकतो हा चॅलेंज होता.

ओंकार : (मला ही भूमिका द्यायचं) या दोघांनी (वैभव आणि धनेश) अगोदर ठरवलं असावं. मला रिडींगसाठी बोलवलं आणि मला तो रोल 'इंन्ट्रेस्टिंग' वाटला. मला हा रोल करायला भीती नाही वाटली.... (संकोच) मला तसं काही वाटलं नाही. की काही प्रॉब्लेम येईल. हा रोल स्वीकारायचा का नाही याबद्दल घरच्यांशी बोलणं अजिबात केलं नाही.

धनेश : ओंकारच्या अगोदर हा रोल दुसऱ्या एका मित्राला ऑफर केला होता. त्याला हे नाटक वाचून दाखवल्यावर तो नाही म्हणाला. 'He went on the backfoot'. 'मला करायला आवडेल पण माझ्या घरच्यांना पटणार नाही'. आता मुद्दा असा आहे की जर तू नाटक करतो आहेस तर हा तुझा इन्डिव्हिज्युअल मुद्दा, त्याच्याशी घरच्यांचं मत जोडणं म्हणजे तुझ्याच मनात शंका आहे. मग तुम्ही मनात भीती ठेवून किती काळ जगणार?....

त्यांचं (घरच्यांचं) आयुष्य मी बदलू शकत नाही

पण मी माझा मुद्दा मांडू शकतो... उदा. मला हा टी. व्ही. वर चालू असलेला 'सेक्शुअल सीन' पहायचा आहे. तो वाईट आहे का चांगला आहे हे मला माहिती नाही... कारण मी काय वाईट आणि चांगलं आहे हे मी पाहिल्या शिवाय कसं काय सांगू शकणार?

## अभ्यास

वैभव : नाटक लिहीत असताना मी एकाही गे माणसाला भेटलो नव्हतो. फक्त बी. सी. एल. मध्ये वर्कशॉपला 'फॅसिलिटेटर' होता तो ब्रिटिश 'प्ले राईट' होता आणि गे ॲक्टीव्हीस्ट होता. त्याच्याशी इन्टरॅक्ट करताना त्यानं त्याचे अनुभव सांगितले... त्याच्याविषयी मला तेव्हा माहिती मिळाली... आता आजुबाजूला मला जे नाटकातले लोक दिसतात मला त्यांना नक्कीच 'ब्लेम' करावंसं वाटतं की ते 'स्टुडीयस' नाही आहेत, पण मला त्याच्याबद्दल 'एम्पथेटीकली' विचार करताना वाटतं की ही भीती कायम असते की तुम्ही 'स्टुडीयस' व्हायच्या नादात 'क्रिएटिव्ह' व्हायला विसरलात तर it becomes more of a paper presentation'.

ओंकार : खरं सांगायचं तर काही केला नाही (अभ्यास). तेव्हा मला ज्या गोष्टी सुचल्या आणि डायरेक्टरला पटल्या त्या केल्या. होमवर्क करताना फोकस गे थीमकडे कमी होता आणि नाटकावर जास्त होता. हे असं आहे ते लोकांपर्यंत प्रेझेंट कसं करता येईल हा होता. मला कोणी गे मित्र माहीत नाहीत. मी एवढा विचार केला नव्हता. मी आत्ता विचार करतो आहे तू विचारतो आहेस म्हणून, पण तेव्हा मी नाटकात कसा फीट होईन हेच लक्ष होतं.

धनेश : माझ्या माहितीचे कोणीच गे मित्र नाहीत. खूप होमवर्क केला की मला खूप दडपण येतं की मला ते होईल की नाही. मी फार माहिती गोळा केली आणि प्रॅक्टीकली मी काही केलं नाही की माझ्या डोक्यात 'ब्लॉक' तयार होतो की नाही हे असं होत नाही... जास्त ह्युमन लेव्हलवर न जाता ते थेअरी लेव्हलवर जातं.

## पर्सनल ग्रोथ

ओंकार : कम्युनिकेशन गॅपमुळे अनेक प्रॉब्लेम होतात याच्याशी मी रिलेट करू शकतो.... (गे) या विषयाशी रिलेटेड कुठलेच रोल केले नव्हते. थोडं वाचनात फक्त आलं होतं.... 'फायर कॉन्ट्रव्हर्सी', 'बेगम बर्वे' ची परीक्षणं किंवा मासिकांमधले लेख.... मध्ये कलकत्त्यामध्ये 'रेनबो परेड' झाली.... एवढंच... माहीत नाही मी कदाचित थोडा फार जास्त ओपन माईंडेड झालो असेन.... नंतर माझ्याकडं कोणताच इश्यू नाही आला की ज्याच्यामध्ये मला कळेल की मी ओपन माईंडेड झालो आहे का नाही.

धनेश : यात मी बॉयफ्रेंड-गर्लफ्रेंडच्या रिलेशनशीप काय एवढंच बघत गेलो नाही.... माझं आणि वडिलांचं नातं, माझं आणि आई-वडीलांच नातं, माझं आणि भावाचं नातं काय अशा पर्सनल लेव्हलवर मी म्हणेन माझी ग्रोथ आहे.... फॅमिलीशी रिलेट करत गेलो.... प्रत्येकाशी नाती कशी मेंटेन करू शकीन हे मी शिकत गेलो.

वैभव : 'समर नखातें'नी सांगितलं की या नाटकाचा फोकस भीती असा आहे.... पण त्याच्याशी निगडीत इतरही गोष्टी आहेत- 'ॲडव्हेन्चर', चावटपणा या भावना तुम्ही काढून टाकू शकत नाही. जास्त ह्युमन लेव्हलच्या सटलटीज लिहिण्याकडे आमचा कल वाढायला लागला आहे. हे नाटक केल्यानंतर गे लोकांबद्दल अशा काही गोष्टी असतील असं प्रेडीक्ट केलंच नव्हतं.... अचानक उलगडायला लागलं.... की जसं काही तुम्ही पहिल्यांदा 'कलर ब्लाईंड' असता आणि एकदम तुम्हाला इतर रंग दिसायला लागतात. हे नाटक मी केल्यानंतर जर मी म्हणालो की गे असणं हे ॲबनॉर्मल आहे तर हे एक 'इनर कॉन्ट्रॅडिक्शन' आहे हे मला माझं नाटक सतत दाखवत राहील.... टाँटिंग करुन माझ्याकडे बोट दाखवत राहील. मला गे हा एक समाजाचा भाग आहे असा सामाजिक टच म्हणून विचार न करता माणूस म्हणून पहाणं जास्त सोपं गेलं.

## आणखी गे भूमिका

ओंकार : मी ते नाटक आवडलं म्हणून केलं. कॅरॅक्टर आवडलं... इट वॉज इन्टरेस्टींग. मी ते काम करू शकलो की नाही हा भाग वेगळा. परत एखादा गे रोल करीन की नाही हे खरं तर नाटकावर अवलंबून आहे. पात्र 'स्टिरिओटाईप' असेल तर मी नाही करणार. त्याच त्याच गोष्टी करायला लागल्या तर मी नाही करणार. वेगळ्या भूमिका करण्याबद्दल (उदा. बायकी, साडी घालणं,

टाळ्या वाजवणं)- नाही सांगता येत, मे बी नाही. मला आत्ता वाटतं की नाही.... 'स्ट्रेट ॲक्टींग' रोल्स ठीक वाटतं.... कोथी, हिजडे हा विषय असू शकतो, असायला काहीच हरकत नाही... पण नाटक बसवताना एक नियम पाळायला हवा की लोकांच्या जास्त अंगावर न येणं हे गरजेचं वाटतं.

## नाटकातील एच. आय. व्ही. / एड्स ची शॉक व्हॅल्यू

वैभव : 'कॉन्फ्लीक्ट' महत्त्वाचा भाग वाटतो. 'क्रिएटेड कॉन्फ्लीक्ट' नसावा हे पटतं.... पण तो तिथे आला नाही तर ती एक फुटकळ चर्चा होते, डायलॉग होऊ शकत नाही. खूप लोकांना हा मुद्दा पटला नाही. डायरेक्टर/ॲक्टर्सना सुद्धा हा मुद्दा फारसा पटला नाही.... एकाने सुचवलं की ते तुम्ही उघड कशाला करता.... ते धूसर ठेवा, ॲम्बिग्युअस ठेवा... ते जास्ती वर्क होईल. पण मला तरी तो शेवट बरोबर वाटतो.

## आव्हान

ओंकार : आठवत नाही, आम्ही सगळेच एकाच वयाची मुलं असल्यामुळे काही टेन्शन नव्हतं. नंतरच्या प्रयोगात आम्ही 'ट्रीटमेंट' बदलली तेव्हा मला टेंन्शन जाणवत होतं की हे व्यवस्थित होईल का नाही.... कमी पात्रं असून लोकांना होल्ड करता येईल की नाही.

धनेश : सगळा एकच सीन आहे. वेगवेगळे 'चंक्स' नाहीत. त्यामुळे मला सगळंच अवघड वाटलं. पहिल्या प्रयोगानंतर लोक म्हणाले की नाटकांत ग्रीप नाही आहे.... ग्रीप नाही म्हणजे काय? मग नाटकांत जास्त जवळीक आणायला पाहिजे (फिजिकल आणि इमोशनल). हा एक चॅलेंज होता. हे नाटक पाहिल्यावर कुठल्याही समूहाची एक प्रतिक्रिया नव्हती. दहा लोकांनी पाहिलं तर दहा प्रतिक्रिया होत्या आणि त्याही 'कन्फ्युझिंग' होत्या. म्हणजे त्यांना नाटक कळलं की नाही इथपासून शंका होती. चॅलेंज होता की प्रत्येक प्रेक्षकाला माझा पॉईंट ऑफ व्ह्यू, लेखकाचा पॉईंट ऑफ व्ह्यू एका साचात आणून दाखवायचा. पहिल्या प्रयोगानंतर काही लोकांनी असा 'फिडबॅक' दिला की 'झेपत नाही बुवा'. तर पुढच्या प्रयोगाच्या वेळी हे नाटक सामान्यांपर्यंत कसं पोहोचवता येईल हा माझ्यासमोर एक मोठा चॅलेंज होता. प्रायोगिक, प्रायोगिक म्हणायच्या नादात आपण सामान्य प्रेक्षकांपर्यंत पोहोचू शकत नाही हे विधान मला मोडायचं होतं आणि त्याचा मी एक प्रामाणिक प्रयत्न केला.

वैभव : तो मनुष्य जो दोघांना दिसतो आणि एकाला दिसत नाही तो आल्यानंतर ज्या गोष्टी बोलल्या नव्हत्या त्या गोष्टी लोक बोलायला लागतात. 'स्ट्रक्चरली' ही गंमतीची गोष्ट होती की बोलताना तुम्ही कशा काही गोष्टी गाळता आणि 'इन्टरॉगेट' केल्यावर कशा सगळ्या बाहेर येतात... 'Perceptions of reality' पात्रानुसार बदलणं हा माझ्यासाठी सर्वात मोठा चॅलेंज होता.

## प्रतिक्रिया

धनेश : काही जण म्हणाले की तुम्ही बॉम्बच टाकताय.... पन्नास वर्षांच्या वरची माणसं होती ती या नाटकाबद्दल खूप कम्फोर्टेबल होती, ते नाटक त्यांना पोचत होतं पण हेच ४०-४५ वर्षं वयाची लोकं होती (आमच्या आई-वडिलांच्या वयाची) यांना हे नाटक फार 'ऑकवर्ड' करत होतं. एकाचं मत होतं की 'तुमच्या वयाचंच नाटक केलं आहे तुम्ही'. पण दुसऱ्या एकाचं म्हणणं होतं की 'तुम्हा मुलांचं काही कळतच नाही.... काही कळत नाही बुवा'.

वैभव : 'ॲनलाईझ' केल्यानंतर तो 'क्रीटीक' कसा आहे, त्याच्या 'बॅकग्राऊंडचा' नेहमी विचार करतो की ते किती 'सेक्शुअली लिबरल' आहेत.... तुमच्यामध्ये प्रत्येक गोष्टीकडे बघायचा ॲटीट्यूड आणि सेक्शुॲलिटीकडे बघायचा ॲटीट्यूड यात 'कोहेरन्स' आहे हे मला नाटकानंतर जाणवायला लागलं.... की मी 'पॉलिटीकली' कुठल्या पार्टीशी रिलेटेड आहे हे सेक्शुअली लिबरल असण्यावर अवलंबून आहे.

एस. एन. डी. टी. कॉलेजच्या मुलींसमोर (सायकॉलॉजी स्टुडंट्स) प्रयोग केला तेव्हा तिथली एक मुलगी उभी राहून म्हणाली की मला जाहीरपणे सांगावंसं वाटतं की आम्ही सेक्शुॲलिटी बद्दल असं-असं बोलतो, विनोद करतो, मी इतक्या ब्ल्यू फिल्मस पाहिल्या आहेत..... ती बोलायलाच लागली.... ही फार पॉझिटिव्ह साईन आहे.

# लैंगिकता

**मुलाखत**

*दिनांक :*
*२, ऑक्टोबर २००३*
*पुणे*

## परिचय

डॉ. भूषण शुक्ल हे पुण्यातील एक नामवंत सायकायाट्रिस्ट आणि थेरापिस्ट आहेत. त्यांच्याशी लैंगिकता या विषयावर केलेली चर्चा.

## सुवर्णयुग- एक स्वप्नरंजन

जेव्हा जेव्हा लोक लैंगिक इतिहासाबद्दल बोलतात तेव्हा लोक 'वात्सायन', 'खजुराहो'चा आधार घेतात. या काळाबद्दल फार काही माहिती उपलब्ध नाही. तो काळ कसा एक सुवर्णयुग होता, आपण पाच हजार वर्षांपूर्वी जगात सर्वात प्रगत देश होतो, अशा तऱ्हेची स्वप्नरंजनं केली जातात. आपला जवळचा इतिहास पहाता तो बहुधा सर्वच परदेशी लोकांची आक्रमणं आणि दबाव/दडपण पहाणारा काळ होता- आणि याच्यामुळे जे काही एखाद्या दबलेल्या समाजाचं होतं ते झालं आहे... आणि ते आपल्या संस्कृतीचा एक हिस्सा बनलंय. आत्ताचा जो भारतीय आहे तो खूप गोंधळलेला भारतीय आहे. जेव्हा समलैंगिकतेबद्दल बोललं जातं तेव्हा त्यांना त्याचा गंधही नसतो. बहुतेकजण म्हणणार की असं काही पूर्वी नव्हतंच मुळी... पूर्वीच्या काळी लैंगिकता ही इतकी विकसित झाली होती की लोकांना समलैंगिक आचरणाची गरजच नव्हती- अर्थात हे विधान अत्यंत मूर्खपणाचं आहे, की वंचित लोकच फक्त समलैंगिकतेकडे वळतात. बहुतेक लोक या अशाच सुरात बोलत असतात. मला वाटतं की आपण लैंगिकता आजच्या दृष्टीकोणातूनच पहायला पाहिजे. पूर्वी काय होतं याबद्दल बोलण्यात काही अर्थ नाही.

आजच्या दिवसांत मला वाटतं की भारतीय लोक सेक्सबद्दल खूप संभ्रमित आहेत, सचिंत आहेत. समलैंगिकतेबद्दल सोडाच, भिन्नलिंगी संभोग ही सुद्धा एक खाजगी गोष्ट आहे, लग्न झाल्यावरच करायची असते, चार भिंतीच्या आत दारं-खिडक्या लावून करायची असते आणि त्याच्या मुख्य उद्देश असा की आपल्यात जी काही शरीराची वासना आहे ती शरीराबाहेर घालवायची असते (नैसर्गिक असून सुद्धा), ही गोष्ट अजिबात बोलायची नसते असा समज आहे. हा भारतीयांच्या लैंगिकतेचा 'पब्लिक फेस' आहे. यात गमतीचा भाग असा की भारतीय लोक स्वत:च्या शौचाच्या सवयीबद्दल अगदी मोकळेपणाने आणि आवडीने बोलतात. ते त्यांच्या घरच्यांना, डॉक्टरांना अगदी तपशीलवार वर्णनं सांगत असतात, 'bowel movement, stool consistency.' आणि हेच पूर्वीच्या शास्त्रात अत्यंत वाईट किंवा घाण मानलं जातं- ज्याला 'बीभत्स रस' म्हणतात की ज्याच्याबद्दल कधी बोलायचं नसतं. म्हणून मला वाटतं की आपला समाज खूप गोंधळलेला आहे आणि आपल्याला आपल्या खऱ्या गरजा काय आहेत ह्या कळल्याच नाहीत त्या स्वीकारणं ही खूप पुढची गोष्ट आहे.

## लैंगिक शिक्षण

शिक्षक : आपण जे आत्ताच्या लैंगिक शिक्षणाबद्दल बोलतो (जे शाळेत शिकवलं जातं) ते अत्यंत संकुचित आहे- त्याचा वकूब फक्त शरीरशास्त्र, पाळी आणि गुप्तरोग एवढ्या पुरताच सीमित आहे. सेक्स पासून मिळवायच्या आनंदाबद्दल कोणी काहीच बोलत नाही. कारण शिक्षकांना ते कसं शिकवायचं ते माहिती नाही.

पालक : लैंगिक शिक्षण पालकांनी कसं द्यायचं हे मला सांगणं अवघड आहे. मला माहीत नाही. खरंच माहीती नाही. जर माझ्या मुलीनी मला ह्या विषयाबद्दल काही प्रश्न विचारले तर त्याची उत्तरं द्यायला मला अवघड वाटेल. जरी मी स्वत:ला खूप उदारमतवादी समजत असलो तरी, पण तिनी जर ह्या विषयांवरची चांगली पुस्तकं वाचली तर मला आवडेल. उदा. 'कामसूत्र.'

विद्यार्थी : आपली शिक्षणपद्धत फार वांझ आहे. दुर्दैवाने- शिक्षकांना सगळं काही येतं, त्यांना सगळ्याची माहिती आहे आणि ते जे काही सांगतात त्यावर डोळे

मिटून विश्वास ठेवायचा असतो आणि तुमचं चातुर्य, ते ज्ञान जसंच्या तसं पुढच्या आयुष्यात लावण्यात असतो, असा समज आहे. मग जर शिक्षकांना या गोष्टी बोलायला आवडत नाहीत, शिकवायला आवडत नाहीत तर शाळेच्या ग्रंथालयात का नाही एक विभाग असू जिथं लैंगिक शिक्षणावरची पुस्तकं १०-१२ वर्षांवरच्या विद्यार्थ्यांना उपलब्ध होतील? प्राथमिक, माध्यमिक, प्रगत असे तीनं पुस्तकांचे गट ठेवायला काय हरकत आहे? मुलांना वाचू देत. 'नवनीत'नी का अशी पुस्तकं काढू नाहीत? त्यात फायदा नक्की आहे. ज्या गोष्टी पालकांना बोलायला आवडत नाहीत त्या गोष्टी जर एखादं पुस्तक समजावून देत असेल तर ते नक्की अशी पुस्तकं आपल्या पाल्याला घेऊन देतील.

विवाद : सामान्य लोक राजकारण्यांना भितात. सामान्य माणूस जर असं काही काम (सेक्स एज्युकेशन) करत असेल तर नक्कीच. पुढाऱ्यांना अशा गोष्टींबद्दल कांगावा करून लगेच प्रसिद्धी मिळवता येते, वर्तमानपत्रात नाव येतं. मला वाटतं की लोक या विषयावर विचार करतात पण ते बोलून दाखवत नाहीत. उदा. समलैंगिकता. खाजगीत लोक म्हणतील की त्यांना त्याच्याबद्दल काही वाटत नाही पण उघडपणे ते असं कधीही मानणार नाहीत. हे लोक मोर्च्यात सामील होत नाहीत, शांत बसतात.

...........

'इंटरनेट'मुळे आता जग बदललं आहे. अनेक पौगंडावस्थेतील मुलं इंटरनेटचा वापर पोर्नोग्राफी पहाण्यासाठी करतात. त्यामुळे आई-वडिलांनी हे ठरवायला पाहिजे की तुम्ही त्यांना लैंगिक माहिती देण्याची व्यवस्था करणार का? नाहीतर ते बाहेर जाऊन ती माहिती इतर कुठल्याही मार्गाने मिळवणार. (बिंदू - आणि कुठूनही माहिती मिळवणार म्हणल्यावर ती माहिती काही वेळेला चुकीचीही असणार.)

...........

समाजात एक मोठं विभाजन होणार अशी चिन्हं दिसत आहेत. हे विभाजन जुन्या आणि नव्या विचारसरणीचं असेल. नव्या पिढीचे खूप लोक खरंच उदारमतवादी विचारांचे आहेत आणि त्यांचे त्यांच्या घरच्यांशी या विषयावर खूप मतभेद आहेत. जेव्हा ही मुलं पालक बनतील (१५-२० वर्षांनी) तेव्हा आपल्याला बदल जाणवायला लागेल.

आत्ताच मला माझ्या क्लिनिकमध्ये हा बदल जाणवतो. माझ्या क्लिनिकमध्ये मला खूप महिला भेटतात ज्या मोकळेपणाने त्यांच्या लैंगिक प्रश्नांविषयी बोलतात (e.g. inhibited orgasm). मला वाटतं असे लोक संवेदनशील लोकांच्या शोधात असतात- डॉक्टर्स, मित्र, समाज कार्यकर्ते, चॅट फ्रेंडस किंवा अजून कोणीही जे त्यांना समजून घेऊ शकतील.

## समलैंगिकता

### माझं अपत्य

आई-वडिलांना आपला मुलगा/मुलगी समलैंगिक असावी असं वाटत नाही. त्यांची आशा असते की त्यांनी लग्न न करण्याचं वेगळं कारण असेल. बऱ्याच पालकांच्या मनात ही शंका येते की आपला मुलगा गे असेल. मी बऱ्याच केसेस पाहिल्या आहेत जिथे पालक आपल्या मुलाला काऊन्सिलींगसाठी घेऊन येतात. 'त्याला लग्न नाही करायचं असं म्हणतोय, बघा त्याच्या डोक्यात काय चाललं आहे.' अशावेळी बहुतेक वेळा दोन्ही पालक क्वचितच येतात, बहुतेक वेळा एकचजण येतो आणि विचारतो, 'काही 'फायर' सारखं आहे का?' त्यांचा प्रश्न असा असतो की हा संशय कसा हाताळायचा? कसं या विषयावर बोलायचं, कशी खात्री करायची? आणि जर हा संशय खरा निघाला तर काय करणार?

### विचारायचं नाही आणि बोलायचं नाही (Don't ask, don't tell policy)

काही अविवाहित मुलांचे पालक असे असतात की ते काही विचारत नाहीत आणि मुलगा त्याबद्दल बोलत नाही- जर आपण अशा पालकांची तुलना जे लोक समलैंगिक द्वेष्टे आहेत अशांशी केली तर मला वाटतं असे आई वडील खूप चांगले आहेत. 'इट इज ओके'. कारण तुम्ही एक पंचावन्न वर्षांच्या माणसाने आणि पन्नास एक वर्षांच्या बाईने त्यांच्या मुलाची समलैंगिकता स्वीकारावी ही अपेक्षा धरणं चुकीचं आहे, विशेषत: जेव्हा त्यांनी त्यांचं सगळं आयुष्य एवढ्या समलैंगिकद्वेष्ट्या (homophobic) समाजात काढलंय. त्यामुळे जरी ते शांत बसले, मुलाला कुठला त्रास नाही दिला तर मला वाटतं

की ते खूप उदारमतवादी आहेत. त्यांनी उघडपणे स्वीकारलं तर चांगलंच होईल पण ती अपेक्षा आत्ता तरी जास्तच आहे. 'I think we need to respect them for whatever nonverbal support they are giving to their child'.

माझ्याकडे काही आकडेवारी नाही पण मला वाटतं की बहुतेक लोक बायसेक्शुयालिटी स्वीकारतात जोपर्यंत चारचौघांत तुम्ही भिन्नलिंगी संबंध ठेवता. पालकांना वाटतं की जरी माझा मुलगा गे असला तरी त्याने एकदा भिन्नलिंगी संभोग केला की त्याला त्याची चटक लागेल आणि त्यामुळे हा प्रश्न सुटेल.

## याला ठीक करा

मी स्वत: 'Person centred approach.' वापरतो. मी त्यांना 'ego-syntonic/ego-dystonic.' समलैंगिकता म्हणजे काय हे सांगतो. जर क्लायंटला समलैंगिकतेचा त्रास होत असेल तर त्या त्रासाची कारणं शोधतो. ही कारणं कशी दूर करता येतील याचा प्रयत्न करतो. त्या मुलाला त्याच्या गरजांची जाणीव करून देतो. स्वत:ला बदलण्यापेक्षा (जे शक्य नाही) त्यांनी जसं आहे तसं त्यांनी स्वत:ला स्वीकारावं ही माझी भूमिका असते. 'This usually works for the client.' पण काही पालक हट्ट धरतात की त्याला 'बरा' (cure) केलाच पाहिजे. पण असे पालक फार काळ टिकत नाहीत कारण त्यांना लगेच कळतं की मी त्यांचा मुलगा 'बरा' होण्यासाठी काहीही औषधोपचार करणार नाही.

जे काही मी ऐकलं आहे त्यावरून- जे जण मी 'बरा' झालो म्हणतात ते बहुतेक वेळा धास्तीमुळे म्हणतात. 'अॅन्टीसायकॉटीक मेडासीन्स' भरपूर प्रमाणात वापरली जातात ज्यांनी त्याची कामवासना कमी होते, 'ECT-Electro Convulsive Therapy (शॉक देणं), 'न्युरोलेप्टीक इंजेक्शन्स' देणं (ज्याचे दुष्परिणाम आहेत). या अशा मार्गाने 'पेशंट'चे हाल केले जातात. या सगळ्याला घाबरून आणि कंटाळून तो थोड्या वेळापुरता 'बरा' झाला असं भासवतो. आणि आई-वडिलांना तेवढंच हवं असतं... त्याचं लग्न लावून देणं. समलिंगी स्त्रियांसाठी तर हा प्रकार जास्ती भयानक होतो.... कारण त्यांचा नवरा त्यांच्यावर बलात्कार करतो, नंतर त्या गरोदर रहातात आणि त्यांच्या आई-वडिलांसाठी हा ते औषधोपचार यशस्वी झाल्याचा सगळ्यांत मोठा पुरावा असतो.

## वैद्यकीय शिक्षण

माझं नशीब चांगलं की मला वैद्यकीय शिक्षणात चांगले शिक्षक भेटले. त्यांतले बहुतेकजण समलैंगिकद्वेष्टे नाहीत. त्यातले बहुतेक विलायतेला जाऊन आलेले, उदारमतवादी आहेत. मी जेव्हा माझं 'पोस्ट ग्रॅज्युएशन'करत होतो तेव्हा एक चर्चा चालली होती 'अमेरिकन सायकायाट्रीक असोसिएशन' मध्ये की 'गे'जना वैद्यकीय उपचार द्यायचे का नाही (treatment), हा इश्यू 'डायग्नोस्टीक कॅटॅगरी' मध्ये घालायचा का नाही. ही चर्चा जगभर चालली होती आणि अशी खुलेआम चर्चा होणं ही खूप चांगली गोष्ट आहे.

मी ससून हॉस्पिटलमध्ये होतो तेव्हा मी खूप 'गे'ज बघायचो. बहुतेक सगळे क्लायंटस लोअर मिडील क्लास किंवा लो क्लास चे होते, कारण ससूनमध्ये आता याच आर्थिक गटातली माणसं येतात. हे क्लायंटस एकदम डॉक्टरवर विश्वास ठेवायचे नाहीत. जर डॉक्टर समलिंगी द्वेष्टा असेल तर ते या विषयावर बोलायचे नाहीत. पण जर एखादा गे दुसऱ्या कुठल्या कारणासाठी (other issues or disorders unrelated to his orientation) हॉस्पिटलमध्ये आला आणि जर मी त्याच्याशी खूप संवेदनशीलतेने वागलो तर तो मोकळेपणाने या विषयावर बोलायचा.

खूप सायकायाट्रिस्ट समलिंगीद्वेष्टे आहेत (violently homophobic). वैद्यकीय शिक्षणात या विषयावर संवेदनशीलता शिकवण्यात येत नाही. हा विषय खूप 'इंटलेक्चुअलाईज' करण्यात येतो. 'आपल्याकडे येणाऱ्यांत किती लोकं समलिंगी आहेत? मग कशाला एवढा वेळ त्यात घालवायचा?' त्यामुळे या विषयावरचा संवेदनशील दृष्टिकोण हा स्वत:च्याच मानसिक वाढीचाच एक भाग आहे.

आपण एकूणच शैक्षणिक पातळीचा ऱ्हास पहातो आहोत आणि त्यात वैद्यकीय शिक्षण या बाबतीत अग्रेसर आहे. आपण एका अशा व्यवसायाकडे पहातो आहोत की त्यांना आपल्या पेशंटबद्दल काहीही कणव नाही. जी मूलभूत गरज आहे की पेशंटला माणसासारखं वागवणं हीच पुरी होत नाही- मग ती खरी आणि अचूक माहिती

देणं असो ('right of information') नाहीतर बरोबर औषधोपचार देणं ('right of proper treatment') असो.

**इंडियन सायकायाट्रीस्ट**

इंडियन सायकायाट्रीक सोसायटीने अजूनही पब्लिकमध्ये त्यांचा दृष्टिकोण मांडलेला नाही. आपण वर्तमानपत्रात समलैंगिकतेविषयी लेख वाचतो पण इंडियन सायकीयाट्रीक सोसायटीचं काय म्हणणं आहे हे वाचायला मिळत नाही. ते स्वत:हून काही याच्यावर मत देत नाहीत, कारण त्यांच्या प्रॅक्टीसमधला हा एक फार छोटा भाग आहे. मला नाही वाटत कुठलीही 'सायकायाट्रीक असोसिएशने' समलैंगिकतेबद्दल त्यांचा दृष्टिकोण लोकांसमोर मांडेल. डॉक्टर्स कुठल्याच बाबतीत स्टँड घेत नाहीत, आणि आजवर घेतलेला नाही. समाजाने यांच्याकडून काहीही अपेक्षा धरू नये. समाजाचे नेते आणि निर्णय घेणारी मंडळी समलिंगीद्वेष्टी असतील (जे भारतात आहे) तर कोणताच व्यावसायिक गट उघडपणे या विषयावर बोलायची हिंमत करणार नाही कारण सर्वांनाच (याला मीसुद्धा मुळीच अपवाद नाही) आपला व्यवसाय शांतपणे करायचा असतो आणि स्वत:च्या कुटुंबाची काळजी वहायची असते.

---

**मुलाखत**

*दिनांक :*
*१०, ऑक्टोबर २००३*
*गाडीखाना, पुणे*

# ए. आर. टी.

**(A.R.T.)**

**परिचय**

डॉ. आर. गंगाखेडकर हे 'नारी' (नॅशनल एडस् रिसर्च इनस्टिट्यूट) चे असिसटंट डायरेक्टर आहेत. भारतातले ते एक नामवंत एडस् चे डॉक्टर मानले जातात. अॅन्टी रेट्रोव्हायरल थेरपी वर त्यांच्याशी केलेली चर्चा.

**स्वस्त जनरिक औषधं (Cheap Generic Drugs)**

परिणाम तर होणार, कारण भारताचा जो जनरिक औषधांचा उद्योग आहे (Generic Drugs Manufacturers) हा जगामधला मोठा उद्योग समजला जातो. भारतानेच एडस् वरील औषधे पुरवण्यात पुढाकार घेतला. 'सिप्ला' नी पहिलं पाऊल उचललं. मग दुसऱ्या कंपनीज्सुद्धा पुढे आल्या- रॅनबॅक्सी, ऑरोबिंदो, हेटेरोफार्मा. यांनी पाश्चिमात्य कंपनीज्समोर मोठं आव्हान उभं केलं. त्यामुळे त्याचा फायदा बाहेरच्या लोकांना जितका होणार तितकाच आपल्यालाही होणार. १९९५च्या आधीची जी नवीन औषधं एफ. डी. ए. (यु. एस. ए.) मध्ये नोंदवली गेली आहेत ती औषधं आपण अजूनही तयार करू शकू, परंतु २००५ नंतर जोपर्यंत आपण एच.आय.व्ही. ची राष्ट्रीय आणीबाणी जाहीर करत नाही तोपर्यंत ही सगळी औषधं तयार करण्याचा परवाना मिळणार नाही. लायसन्स्ड औषधं- मग त्याच्यामध्ये काही मार्ग आहेत. एक म्हणजे सक्तीचा परवाना ('Compulsory Licensing') म्हणजे पाश्चिमात्य कंपनीज्ना ऑफर करायचं आणि म्हणायचं आपल्याला परवडेल अशा किंमतीत द्या आणि त्यांनी नाही दिलं तर जनरिक कंपनीज्ना ती तयार करण्याची परवानगी देणे. किंवा दुसरा उपाय आहे की सरकारनी स्वत:च औषधं तयार करायची. त्याला निर्बंध येणार नाहीत. तिसरा उपाय हा की ज्याला 'पॅरलल इम्पोर्टस' म्हणतात. कंपनीच्या सगळ्यांत स्वस्त भावात ही औषधं आयात करायची. तसं पाहिलं तर ही औषधं आपल्याकडे सगळ्यांत स्वस्त मिळू शकतील.

**औषध प्रतिकारक विषाणू ('Drug Resistant Virus')**

मी याच्यावर बोलू शकत नाही कारण याच्यावर आपल्याकडे पर्याप्त संशोधन झाले नाही. नुसतं अंदाजानं सांगायचं झालं तर- रुग्ण ('HIV+') फार प्रगत अवस्थेत असेल आणि तो औषधं ('ART') सुरू झाल्यावर लवकरच दगावला (एखाद्या वर्षाच्या आत) तर कदाचित त्याला तेवढा काळ असुरक्षित लैंगिक संबंध ठेवायला मिळालेला नसतो. पण तो जर दीर्घ काळ जीवंत असेल आणि त्यात तो असुरक्षित लैंगिक संबंध ठेवत असेल तर हा मुद्दा (drug resistance) उपस्थित होण्याची शक्यता

असते. म्हणून जेव्हा आपण ही ('ART') औषधं सुरू करतो तेव्हा प्रत्येक रुग्णाला आपण सुरक्षित संभोग पद्धती (Bindu-'using condoms or non penetrative sex') बद्दल सांगतो आणि त्याला सावधान करतो की त्याने जर ही खबरदारी नाही घेतली तर औषध प्रतिकारक विषाणू पसरवू शकतो.

**समलिंगी समाज (Gay Community)**

(बिंदू : समलिंगी समाजात निरोध वापरण्याचे प्रमाण खूपच कमी आहे.)

मग इथे औषध प्रतिकारक विषाणू पसरण्याचे प्रमाण जास्त असेल. इथं औषधं सुरू करण्याआधी जे काऊन्सिलींग केलं जातं त्यात सुधारणा करणे आवश्यक आहे. आपण एखाद्या रुग्णाला सुरक्षित लैंगिक संबंधाबद्दल समजावून सांगितलं आणि त्यानं तसं आचरणात आणावं असं वाटत असेल तर एक लक्षात ठेवलं पाहिजे की- तो मूलभूत फरक घडून आणण्यासाठी रुग्णांनी असुरक्षित लैंगिक संबंध ठेवणं हे स्वत:साठी देखील धोकादायक आहे हे समजावून सांगितले पाहिजे. त्याला हे सांगणं आवश्यक आहे की औषध प्रतिकारक विषाणू त्याच्या समाजामध्ये वाढत असला तर 'MSM' गटात देखील हा प्रश्न गंभीर रूप धारण करू शकतो कारण हा समाज छोटा आणि बंदिस्त आहे (closed community). त्यांनी जर असुरक्षित संभोग केला आणि त्याच्या जोडीदारांनीही इतर व्यक्तींबरोबर असुरक्षित संभोग केला तर काही काळानंतर त्यांच्या शरीरात एखाद्या औषध प्रतिकारक विषाणूचा संसर्ग होऊ शकेल आणि मग 'ART' औषधंसुद्धा निकामी ठरतील. त्यामुळे सुरक्षित लैंगिक संबंध ठेवणं हे गे समाजासाठीच नाही तर स्वत:साठी देखील आवश्यक आहे... हे जर असं समजावून सांगितलं तरच त्याच्या आचरणांत कायमचा फरक पडेल. नाहीतर असे बदल तात्पुरते ठरण्याची शक्यता जास्त असेल.

............

'AZT' चा ड्रग रेझिस्टन्स उलटवता येतो. (reversible). नेव्हीरॅपिन चा ड्रग रेझिस्टन्स उलटवता येत नाही (nonreversible). शिवाय तो क्लास रेझिस्टन्स म्हणून येण्याची शक्यता असते. म्हणजे नेव्हीरॅपिनसाठी रेझिस्टन्स तयार झाला तर- सर्व (NNRTI) औषधं आहेत- नेव्हीरॅपिन, इफाव्हीरेन्झ, डेलाव्हीरिडीन या सगळ्यांसाठी रेझिस्टन्स तयार होऊ शकतो. 'NRTI मध्ये हा प्रश्न नाही. PI ला Shared resistance आहे. शेअर्ड रेझिस्टन्सची औषधाची प्रोफाईल बघून मग दुसरी औषधं द्यावी लागतात.

**पर्यायी औषधं- आयुर्वेद, होमियोपॅथिक, उनानी (Alternative medicines)**

(बिंदू : एच. आय. व्ही. पॉझिटीव्ह लोक ही औषधं हा रोग बरा व्हावा म्हणून घेतात.)

त्याचं एक महत्त्वाचं कारण आहे, की काऊन्सिलर बरोबर माहिती देत नाहीत. काऊन्सिलर्स नेहमी म्हणतात की एच. आय. व्ही. बरा होण्यासाठी कोणतेही औषध नाही. आपण बरे होण्याबद्दल न बोलण्यापेक्षा एच. आय. व्ही. वर नियंत्रण करता येते याबद्दल बोललं पाहिजे. हे नाही केलं तर लोक निराश होऊन जे लोक एच. आ. व्ही. बरं करण्याची ग्वाही देतात त्यांच्याकडे जातात. मग डॉक्टरने एच. आय. व्ही. पॉझिटीव्ह रुग्णांनी पर्यायी औषधं घेऊ नयेत असा पाबंद घालायचा का? माझ्यामते असे मत व्यक्त करणे बरोबर ठरत नाही. पण आपण असा विचार करायला हवा की- वैद्यकीय व्यवसाय हा पुराव्यावर उभा असला पाहिजे. (Practice of medicine has to be evidence based) जेव्हा तुम्ही म्हणता की अमुक अमुक औषध एखाद्याने सात दिवस घ्यावं, त्याचा अर्थ असा असतो की सात दिवसांनी तो आजार बरा होईल किंवा कमी होईल. परंतु आपल्याकडे पर्यायी औषधाने एच. आय. व्ही. ची संख्या कमी होते, किंवा ती औषधे घेण्याने रुग्णाच्या जगण्याचा कालावधी वाढतो याचा पुरावा नाही. कोणीही असे शास्त्रीय पेपर्स छापलेले नाहीत... हे लोकल वर्तमानपत्रात तसे छापले असतील. त्याला काही अर्थ नाही, कारण व्यवस्थित पुनरावलोकन (Proper reviews) झाले आहेत का नाही हे सांगणं कठीण असतं. असे पेपर्स कधीही अशा जर्नल्समध्ये आले नाहीत की जिथे 'Good peer review mechanisms' आहेत. अजून एक गोष्ट अशी की ही औषधंसुद्धा महाग आहेत... आता ए. आर. टी. स्वस्तात स्वस्त महिन्याला १२५० ते १३०० रुपयांमध्ये मिळतात. मग पर्यायी औषधांकडे का जायचं?

(बिंदू : असा वाद घातला जातो की त्याने काही अपाय तर होणार नाही ना?)

का नाही... त्याने आर्थिक हानी तर होतेच, मानसशास्त्रीय (pshycological) हानी देखील होते. त्याला डिप्रेशन येण्याची शक्यता असते. ही औषधे प्लसिबो देण्यासारखी ठरतात. शेवटी काही लोकांत प्लसिबोमुळे थोडा फायदा दिसतो. म्हणून आपण सगळ्यांना काय प्लसिबो देतो का? आपण जी औषधं देणार असू त्याच्यामुळे रुग्णांमध्ये झालेली सुधारणा दिसायला हवी... यांच्या (पर्यायी औषधांच्या) जे संशोधन/ट्रायल्स असतात त्यात कित्येकवेळा 'Patients are not consecutive' त्यांचं 'study design' चांगलं नसतं, रुग्ण निवडीचा, वगळणुकीचे नियम चांगले नसतात (selection/exclusion criteria is not good) जर 'स्टडीचं रिसर्च डिझाईन' चांगलं नसेल तर त्या संशोधनाच्या रिझल्टसवर खात्रीने कसा विश्वास ठेवायचा?

**फुकट औषधं (Free ART)**

मला वाटतं की ART फुकट द्यायला हव्यात. काही लोक म्हणतात की त्यासाठी क्षमता वाढवावी लागेल (capacity building), प्रशिक्षण द्यावं लागेल. लोक म्हणतात (to protect their own vested interests) की सगळ्यांनी हे देणं शक्य नाही. मला वाटतं की औषधोपचारासाठी इतर रोगांपेक्षा एच. आय. व्ही. काही फार वेगळा रोग नाही. प्रशिक्षणानेच याच्या उपचार पद्धतींचा वापर करण्याची क्षमता वाढू शकते. आपण ते करू शकू. लोक प्रश्न विचारतात की- डॉक्टरांना याची पुरेशी माहिती नाही आणि त्यामुळे औषध प्रतिकारक विषाणू वाढेल अशा परिस्थितीत आपण ही औषधं का द्यायची?

कुठल्याही देशात माणसाची किंमत सारखी आहे. एखादा देश जास्त श्रीमंत आहे म्हणून तिथे ही औषधं फुकट द्यायची आणि आपल्या इथे नाही कारण आपल्या सरकारला परवडत नाही, हे मला पटत नाही. 'Equity in health is a critical issue. In every disease intervention equitable distribution of health resources is critical. मग लोक म्हणतात की एच. आय. व्ही. ला इतर रोगांपेक्षा जास्त महत्त्व का द्यायचं? माझा दृष्टिकोण असा आहे की एडस्च्या निमित्ताने आपल्या सार्वजनिक आरोग्यक्षेत्रात बराच चांगला बदल झाला आहे. याच्यामुळे आपल्या 'Transfusion services' मध्ये सुधारणा झाली, काऊन्सिलींगला महत्त्व आले. तसे पाहिले तर 'HIV has acted as an agent of change'. आपण फुकट ए. आर. टी. दिली तर आपल्या लक्षात येईल की इतरही वैद्यकीय क्षेत्रातले लोक इतरही आजारांसाठी फुकट औषधं मागतील. आणि तसं झालं की आरोग्य सेवेसाठी जे वार्षिक बजेट आहे ते वाढेल. चांगली आरोग्यसेवा हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे आणि याची जाणीव एड्समुळे होणार असेल तर इथूनच का या अध्यायाची सुरुवात कू नये?

(बिंदू : एच. आय. व्ही. हा टी.बी. सारखा नाही की सहा महिने औषधे (DOTS) घेतली की काम संपलं... हा प्रश्न आयुष्यभर औषधं देण्याचा आहे. म्हणून लोकांची या 'long term commitment' ची तयारी नाहीये.)

मला नाही पटत... कारण त्याची सुरुवात आत्ताच झाली आहे. सरकारने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे की १४ वर्षाखालील एच. आय. व्ही. पॉझिटिव्ह मुलांना फुकट ए. आर. टी. औषधं दिली जातील. 'I think this is a landmark decision, a long term commitment to the health care of such individuals' आता हे कसं करणार हे पाहू... बाहेरून (विदेशी) मदत घेणार का इथूनच पैसे उभे करायचे, का खाजगी क्षेत्रातली मदत घ्यायची, का विमा कंपन्यांची मदत घ्यायची ते पडताळले जाईल... पण ही मोठी आव्हानं आहेत म्हणून फुकट औषधं द्यायचीच नाहीत हे मला पटत नाही.

(बिंदू : या सरकारच्या निर्णयात 'Victimisation bias' आहे का या निर्णयामागे? मुलं ही एच. आय. व्ही. चे बळी आहेत असा आशय पण असेल. त्यांच्यासाठी काही केलं पाहिजे, पण जे प्रौढ आहेत, ज्यांना लैंगिक संबंधातून एच. आय. व्ही. झाला आहे त्यांचं वाटेल ते होऊ दे? (The 'sinners' deserve it).

तुम्ही ग्लास अर्धा भरलाय हे पहाणार की अर्धा रिकामा आहे हे पहाणार? मी तो अर्धा भरलाय असं बघतो. आपण असं का बघत नाही की हा एक पायलट प्रकल्प आहे... कारण एच. आय. व्ही. पॉझिटिव्ह मुलांची संख्या कमी आहे. या प्रकल्पामुळे कळेल की सरकारमध्ये असा प्रकल्प राबवण्याची, लोकांना प्रशिक्षण देण्याची, आर्थिकदृष्ट्या हा प्रकल्प हाताळण्याची आणि आरोग्य सेवेचा दर्जा वाढवायची क्षमता आहे का? I will not

want to look at this as a judgmental step. I think its a very progressive step and a step in the right direction.

## वाटेल तसं ए. आर. टी. देणं आणि काऊन्सिलींग

**(Indiscriminate ART and counseling)**

हे खरं आहे की आपल्या देशात प्रि-टेस्ट आणि पोस्ट-टेस्ट काऊन्सिलिंगचा दर्जा चांगला नाहीये. काऊन्सिलिंगला फारसं महत्त्व दिलं जात नाही. खाजगी वैद्यकीय प्रॅक्टीस ही पूर्णपणे धंदेवाईक असल्यामुळे डॉक्टरला काऊन्सिलर नेमून क्रेडीट किंवा पैसा शेअर करायची इच्छा नसते. इत:पर, कुठलाही डॉक्टर आपल्याला संवाद साधायची कला नाही किंवा त्याचं ज्ञान नाही हे कबूल करणार नाही. त्यामुळे काऊन्सिलर्सचा खाजगी दवाखाना किंवा टेस्ट लॅबोरेटरीजमध्ये वापर होत नाही. आणि याचमुळे औषधं सगळे नियम पाळून निष्ठेने घेतली जात नाहीत. आणि यामुळे इतरही ताप संभवतात. (When the drug adherence is low and the disease management becomes problematic). वाटेल तसे ए. आर. टी. देण्याच्या पूर्वी खूप प्रमाणात केसेस असायच्या. आता हे प्रमाण कमी होत आहे. यासाठी वैद्यकीय संस्थांनी हा एक महत्त्वाचा विषय मानून त्यावर चर्चा केली पाहिजे, फिजिशियन्स व सर्जन्सना प्रशिक्षण दिलं पाहिजे. याने हे प्रमाण खूप कमी होईल.

## ड्रग ॲढेरन्स काऊन्सिलींग

हे एक तर नेहमीच्या काऊन्सिलींगचा भाग असू शकेल किंवा एक विशिष्ट शाखा. नेहमीच्या काऊन्सिलींगचा भाग असेल तर त्यांना जास्त प्रशिक्षण द्यावं लागणार कारण त्यांना वैद्यकीय ज्ञान नसतं. आपल्याला हे विशिष्ट काऊन्सेलर्स लागणार आहेत जे ड्रग ॲढेरन्स काऊन्सिलींग देऊ शकतील.. निदान सुरुवातीला या सहा राज्यांत (high prevalence) हा प्रयोग करणे आवश्यक आहे.

## पूर्वग्रहदूषित काऊन्सिलींग (Prejudice in gay counseling)

(बिंदू : डॉक्टर किंवा काऊन्सिलर हे समलिंगी द्वेष्टे आहेत असा अंदाज आला की गे क्लायंट लैंगिकतेबद्दल बोलत नाहीत आणि बोललं नाही तर त्यांना सुरक्षित लैंगिक संबंधांबद्दल माहिती कशी देणार?)

बरोबर आहे. मला वाटतं की ही फक्त दुसरीच वेळ आहे वैद्यकीय इतिहासात की आपण लैंगिकतेबद्दल बोलायला लागलो आहोत. पहिली वेळ होती कुटुंब नियोजन प्रकल्पाच्या वेळेस. खरं पहाता दुसरी वेळ असायला पाहिजे होती एस. टी. डी. (गुप्तरोग) कन्ट्रोल प्रोग्रॅमसाठी... पण तसं झालं नाही. कारण आपण तेव्हा एस. टी. डी. साठी काऊन्सिलींगचा आधार घेतला नाही. आपल्या समाजाच्या चौकटीत लैंगिकतेबद्दल बोलणं बसत नाही. आपण मागच्या पन्नास वर्षातला इतिहास पाहिला तर आपल्या लक्षात येईल की आपण लैंगिकतेबद्दल साधे सोपे प्रश्न कसे विचारायचे हे सुद्धा शिकलो नाही. सेक्शुयालिटी काऊन्सिलींग दूरची बाब आहे. पण एच. आय. व्ही. मुळे आता सेक्शुयालिटी काऊन्सिलींगला महत्त्व यायला लागले आहे. तरीसुद्धा एच. आय. व्ही. संसर्गामुळे एक इमर्जन्सीची स्थिती निर्माण झाल्यामुळे तातडीने काऊन्सिलर्स तयार करणे हे गरजेचे झाले आहे. त्यासाठी क्रॅश कोर्सेस देखील सुरू झाले- सात दिवसांत एच. आय. व्ही. काऊन्सिलींग शिकवले जाऊ लागले... आणि सात दिवसांत तयार होऊन तो काऊन्सिलर कार्यरत व्हायला लागला. आता सात दिवसांत तो लैंगिकतेबद्दल कसा काय शिकणार? ही गोष्ट शिकणं अवघड आहे कारण याचा संबंध स्वत:चा दृष्टीकोण/ॲटीट्यूड, ज्ञान यावर अवलंबून आहे... आणि या गोष्टी कॉलेजेसमध्ये कधीच शिकवल्या गेल्या नाहीत. मग लोक शिकणार कुठून?

पण बदल होतोय... मला आठवतंय चौदा वर्षांपूर्वी फक्त २-४ गे लोक असायचे (आऊट असलेले). आता आपल्याकडे गे संस्था दिसतात, प्रत्येक मोठ्या शहरात की जे त्यांचे प्रश्न हाताळतात. 'So from a few people who were openly gay, we have moved on to a few organisations in every city who work for gay rights.' त्यामुळे मला वाटतं की हा एक मोठा बदल आहे... आपण नुसतं असं म्हणणं की लोक लैंगिकतेबद्दल बोलत नाहीत हे मला पटत नाही... ते शेवटी आपल्या हातात आहे... आणि या कार्याला आपण कसा आकार देणार आहोत हे आपण ठरवायचंय.